RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : १६२ वा | शुक्रवार दि. ०८ ऑगस्ट २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

इंडिया आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे शेवटच्या रांगेत

शिवसेना-भाजपची बोचरी टीका, तुमच्यापेक्षा एकेक खासदारवाले पक्ष बरे

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दिल्लीतील सुनहरी बाग रस्त्यावरील शासकीय निवासस्थानी ङ्गइंडियाफ्तील पक्षनेत्यांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावरील आरोपांचे सादरीकरण पुन्हा करुन दाखवले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे मागच्या रांगेत बसल्याने सत्ताधाऱ्यांनी टीकेची झोड उठवली आहे. शिवसेना, भाजप नेत्यांनी ठाकरेंवर बैठक व्यवस्थेवरुन निशाणा साधला आहे. स्नेहभोजनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप गट) अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, द्रमुकच्या नेत्या कनिमोळी, शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पत्नी रश्मी, सपा नेते अखिलेश आणि रामगोपाल यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, नॅशनल कॉन्फरन्सचे फारूक अब्दुल्ला, पीडीपी नेत्या मेहबुबा मुफ्ती, डाव्या आघाडीचे डी. राजा नेते राहुल गांधी यांच्या घरी उपस्थित होते. यावेळी ठाकरे सातव्या रांगेत बसल्याचे फोटोंवरुन दिसते. भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी एक्सवरुन टीका करताना म्हटलं आहे, की उद्धव ठाकरे भाजपसोबत होते, तेव्हा त्यांना आणि मातोश्रीला किती सन्मान होता. देशातील भाजपचे अनेक महत्त्वाचे नेते मातोश्रीवर जाऊन सन्मान करत. २०१९ लोकसभा निवडणुकीच्या वेळी अमित शाह मातोश्रीवर आले होते. याची आठवण उपाध्येंनी करुन दिली.पुढे उपाध्ये म्हणतात की,कट टू २०२५, आता पहा, महाविकास आघाडीत आल्यापासून राहुल गांधी, सोनिया गांधी कुणी मातोश्रीवर गेले? उत्तर नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर आंदरांजली वाहण्यास

कुणी काँग्रेस नेता गेला? उत्तर नाही. बाळासाहेब ठाकरेंचा काँग्रेसने हिंदुहृदयसम्राट असा उल्लेख केला? उत्तर नाही. दरवर्षी आता उद्धव ठाकरेच दिल्लीत राहुल सोनिया गांधींना भेटायला जातातअशी टीका केशव उपाध्येंनी केली आहे. हिंदुत्व सोडलं, विचारधारा सोडली, त्यातून मान गेला, सन्मान गेला, हातात पडलं काय? आता तर काय बैठकीत अपमानाची थेट शेवटची रांग अशी टीकाही उपाध्येंनी केली आहे.

मंडल आयोगाच्या मागण्यांची पूर्तता होणे सामाजिक न्यायासाठी गरजेचे किशोर पवार

बुलडाणा येथे ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्यावतीने मंडल दिवस साजरा

जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा येथे ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्या वतीने मंडल दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मंडल आयोगाच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करत ओबीसी समाजाच्या मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. मंडल आयोगाची स्थापना १९७९ मध्ये मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी करण्यात आली होती. बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेल्या अहवालानुसार भारतात ओबीसी लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असून, त्यांना २७ टक्के आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली होती. या शिफारशींमुळे ओबीसी समाजाला शिक्षण, नोकरी आणि प्रशासनात प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी महत्त्वाचा मार्ग खुला झाला. मात्र आजही ओबीसी समाजाच्या अनेक मूलभूत मागण्या प्रलंबित आहेत. ओबीसींची स्वतंत्र जनगणना होणे अत्यावश्यक आहे, कारण याच माध्यमातून त्यांच्या वस्तुस्थितीचा अचूक अंदाज घेतला जाऊ शकतो. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभेत राजकीय आरक्षण मिळणे ही ओबीसी समाजाच्या राजकीय सशक्तीकरणासाठी गरजेची बाब आहे. याशिवाय, आरक्षणाच्या अंमलबजावणीत होणारे अन्याय थांबवण्यासाठी उपवर्गीकरण आणि आरक्षण पुनर्रचना तातडीने करण्यात यावी. मंडल दिवसाच्या निमित्ताने ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाने या मागण्यांबाबत शासनाचे लक्ष वेधत ठोस कार्यवाही करण्याची मागणी केली. हा दिवस केवळ इतिहासाची आठवण नसून सामाजिक न्यायासाठीच्या संघर्षाचे स्मरण असून, ओबीसी समाजाच्या संविधानिक हक्कांसाठी सातत्याने लढा देण्याचा निर्धार या कार्यक्रमात

व्यक्त करण्यात आला. यावेळी राज्य सल्लागार डॉ.शिवशंकर गोरे, जिल्हाध्यक्ष किशोर पवार, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख विठ्ठल इंगळे, सचिव अनिल हिस्सल, बुलडाणा तालुकाध्यक्ष गजानन पडोळ, उपाध्यक्ष निलेश डुकरे, कार्याध्यक्ष जनार्धन तेजनकर, सचिव प्रशांत डहाळे, मोताळा तालुकाध्यक्ष निळकंठ उचाडे, उपाध्यक्ष सतीश मुळे, तसेच कार्यकारिणी सदस्य संजय खांडवे, राजेंद्र धोंडगे, गजानन हुडेकर,जयंत शेलेकर, मनोहर डुकरे, राहुल बाजारे इ.सदस्य उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

कायद्याच्या हातांपलीकडचे!

संपादकीय लेख

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाचे मंत्री व आमदार यांच्या वागण्या-बोलण्याने मध्यंतरी चांगलाच गदारोळ माजला. त्याची सर्वत्र चर्चा झाली. एक मंत्री सभागृहात भ्रमणध्वनीवर एक खेळ खेळत आहेत, असा आरोप चित्रणासकट झाला. एका मंत्रिपुत्राच्या आईच्या नावाने डान्सबार परवाना आहे, याचाही उल्लेख झाला. एका मंत्र्याच्या मुलाने मालमत्तेच्या लिलावात घोटाळा केला, असाही आरोप झाला. यात फक्त पत्ते खेळणाऱ्या मंत्र्यांचा खातेबदल झाला; पण त्या मंत्र्यांची बडतर्फी झाली नाही. याशिवायच्या इतर प्रकरणांत तर तेही झाले नाही. एका आमदाराने आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली. त्याचेही चित्रण होते. त्यावरून चांगलीच टीका झाली. मात्र, ही टीका झाल्यानंतरही त्या आमदाराला सदनात व सदनाबाहेर कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागले नाही. यापुढेही त्याला कुठल्याही कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, असा मतप्रवाह आहे. त्या घटनेचे चित्रण झाल्यावरही गुन्हा दाखल झाला नाही. कदाचित चौकशी होणार असेल, किंवा प्रलंबित असेल. मात्र, उच्चपदस्थांच्या, सत्ताधाऱ्यांच्या गैरकृत्यांना आळा बसेल असे ठोस काही न केल्यामुळे समाजात चुकीचा संदेश गेला, हे लक्षात घ्यायला हवे. ही सारी प्रकरणे, घटना पाहिल्या तर, कायद्यासमोर सारे समान आणि कायद्याचे साऱ्यांना समान संरक्षण या तत्त्वाला बगल दिली गेली व ही अशी बगल दिली जाते. एरवी साधी किंवा गंभीर दुखापत, कामात अडथळे आणणे, हालचालीस प्रतिबंध करणे, अपाय करणे अशी कृत्ये ऐच्छिक किंवा मुद्दामहून केली असतील तर भारतीय न्यायसंहितेप्रमाणे त्यांस गुन्हे असे संबोधले जाईल. आमदार महोदयांनी उपाहारगृहात येऊन, तेथील कर्मचाऱ्याला मारहाण करून जमिनीवर पाडले, असे चित्रणात दिसले. ङ्गहे जे चित्रण दिसते ते खरे नाही वा त्यातील व्यक्ती मी नाहीफ असे आमदार महोदयांनी म्हटले नाही. त्या कर्मचाऱ्याने तक्रार दिली की नाही, याने फरक पडत नसतो. वाहिन्यांवरील चित्रण पाहून स्थानिक पोलिसांनी तेथे जाऊन चौकशी आणि शहानिशा करणे, त्या कर्मचाऱ्याची दुखापत कशा प्रकारची आहे, याचा वैद्यकीय अहवाल प्राप्त करणे, पीडिताची जबानी नोंदवणे या अपेक्षित आणि स्वाभाविक बाबी असतात. आमदार महोदय याला अपवाद कसे ठरतात, हे आजवर उलगडले नाही. ङ्ग अदखलपात्र गुन्हा म अशी नोंद झाली असे कळते. याचा अर्थ आम्ही दखल घेणार नाही, पीडिताला वाटल्यास तो न्यायालयात खासगी तक्रार करू शकतो. दखलपात्र किंवा अदखलपात्र हा फैसला आम्हीच करणार, दुखापत साधी की गंभीर हेही आम्हीच ठरविणार; कारण आम्ही सत्ताधारी आहोत. तटस्थ, संवेदनशील, स्वतंत्र यंत्रणांना त्यांचे काम करू द्यायचे नाही व प्रकरण मिटले असे दाखवायचे. मग दिलगिरीलाही अर्थ राहत नाही. आमदार महोदय म्हणतात, की अन्नपदार्थांचा दर्जा चांगला नसेल व ते खराब, शिळा असतील तर मी पुन्हा असाच वागेन. अन्नपदार्थांच्या बाबतीत तेच सगळे निर्णय घेणार. या मग्रुरीला शिक्षा नसते असेच सामान्यांना वाटणार. मात्र, साधारण व्यक्तीने ही कृती केली असती तर त्याला व सगळ्यांनाच पोलिसी खाक्या दिसला असता. अशा साधारण व्यक्तीला कदाचित काही दिवस कोठडीत काढावे लागले असते. पीडित कर्मचाऱ्याने काय केले, वा करायचे ठरवले हे ज्ञात नाही. मुख्यमंत्र्यांकडून कडक पावले उचलली जातील, ही शाश्वती नाही. आमदाराला व मंत्र्यांना समज मिळाली, हेही नसे थोडके. मुख्यमंत्र्यांनी सदनातील आपल्या भाषणात लोकप्रतिनिधींच्या वागण्या-बोलण्याचे वाभाडे काढले; परंतु राज्याचे गृहमंत्री म्हणून पीडिताला संरक्षण देण्याचे आश्वासन त्यांनी दिले नाही. त्या पीडिताला गृहमंत्र्यांकडून किंवा त्यांच्या खात्याकडून दिलासा नाही. त्याच्या कायदेशीर अधिकारांचे भान नसणारे, त्याबाबत असंवेदनशील असणारे गृहखाते जनतेला आपले कसे वाटणार, हा खरा प्रश्न आहे. शासनाच्या व्यवहारात असा ठळक भेदभाव का दिसतो? कायद्याची अंमलबजावणी करताना सरकारचा विभाग हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नसतो, हे ध्यानात घ्यायला हवे. सत्तेत असलेला पक्ष बदलत जाईल. मात्र, शासकीय अधिकारी, विभागप्रमुख हे कायमस्वरूपी पद असते. सरकार म्हणजे कार्यपालिका, आणि तिची बांधिलकी फक्त कायदा आणि राज्य घटनेशी असते. सत्तेत असलेला पक्ष व त्या सत्ताधारी पक्षाचे मंत्री हे अधिकाऱ्यांच्या कामात ढवळाढवळ करतात आणि अधिकारी देखील ते खपवून घेतात. कायद्याच्या कक्षेत येणारी कारवाईही गृह विभाग करत नाही किंवा त्याचा कारभार सांभाळणारा मंत्री अधिकाऱ्यांना कह्यात ठेवतो. आमदाराच्या प्रकरणात गृह खात्याने काय कुठली चौकशी केली, त्याचा अहवाल तयार केला का व तो कधी व कोणाला सादर केला याचा तपशील लोकांसमोर नाही. भारतीय न्याय संहितेतील अदखलपात्र गुन्हेच संबंधित आमदाराच्या हातून घडले, हा निष्कर्ष कशावर आधारित आहे हे कळेल का? लोकप्रतिनिधी आमदार निवासातील उपाहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना नुसता दटावत नव्हता, तर सर्वांदेखत शिवीगाळ, मारहाण इत्यादी करत होता. इतके सारे असूनही दखलपात्र गुन्हा घडत नाही, हे पटत नाही. लोकप्रतिनिधींना विशेष स्थान व संरक्षण नवीन संहितेत देण्यात आले आहे का, आणि तरतुदींचा असा अन्वयार्थ सत्ताधारी व विरोधी असा फरक करू देणार नाही. मग जागेचा, ठिकाणाचाही प्रश्न नाही; कारण असे वर्तन उद्या मंत्रालयातील, विधिमंडळातील व विश्रामगृहातील वा खासगी उपाहारगृहात केले तरी कुठलीच कारवाई करता येणार नाही वा होणार नाही. जे आमदार निवासाच्या आवारात चालते तेच शासकीय कार्यालये आणि इतर आस्थापनांत चालवावे लागेल. मनाजोगे उत्तर

किंवा अपेक्षित खुलासा मिळत नसतो तेव्हा शाई फेकणे, लाथा मारणे, तोंडाला काळे फासणे इत्यादी महाराष्ट्राला नवे नाही. नेते, कार्यकर्ते कोणाची भीती न बाळगता असे करीत असतात. एकदा का आपला पक्ष व आपले कार्यकर्ते, आपली ङ्गयुतीफव ङ्गआघाडीफ्तील साथीदार व सहकारी यांना मोकळे रान देण्याचे ठरले की मग पक्ष पातळीवरही कारवाई करता येणार नाही. शिस्तभंग सत्तेवरील सहकारी पक्षाच्या नेत्याचा असेल तर मी काहीच करणार नाही; कारण असे माझ्या पक्षाच्या बाबतीत घडले तर मग हालचाल करावीच लागेल. युती-आघाडीचा हा धर्म सत्ताधारी व विरोधक दोघेही पाळतात व पाळतील. याला लोकांचाही आक्षेप नाही असे म्हणायचे, कारण ते आम्हाला वारंवार निवडून देतात. पुढारी हे विसरतात की निवडून मतदार देतात. लोक / जनता त्यांच्या पलीकडेही असते. ङ्गलाडकाफ किंवा ङ्गलाडकीफ असे काही नसते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की ङ्गनिवडणुकीतले यश हा घाण झाकण्याचा किंवा सत्ताउपभोगाचा परवाना नव्हे.फ (शिवनंदन पासवान वि. बिहार सरकार (१९८३) १ सुप्रीम कोर्ट केसेस ४३८ परिच्छेद २०). लोकांना कस्पटासमान समजायचे असे ठरविल्यावर बेताल, बेजवाबदार वर्तनाला व वक्तव्याला कारणीभूत असलेल्यांना काढण्याचा प्रश्नच नाही. मग गंभीर आरोप असलेल्यांनाही सुरक्षित ठेवावे लागते. सारांश काय की, वेगळा पायंडा पाडला तर पंचाईत होईल. पत गेली तरी सत्ता टिकविण्याची अपरिहार्यता विधिमंडळाची, आपल्या राज्याची प्रतिमा डागाळेल याचेही वैषम्य वाटत नाही. हीच खरी शोकांतिका.

होमिओपॅथिक असोसिएशनतर्फे स्व.डॉ. अजय ढगे यांना जयंती निमित्त अभिवादन

जनसंचलन/बुलढाणा

येथील ज्येष्ठ होमियो तज्ञ स्व. डॉ. अजय ढगे यांना जयंती निमित्त बुलढाणा होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनच्यावतीने समारंभपूर्वक अभिवादन करण्यात आले. येथील बसस्थानकानजीक स्व. डॉ. अजय ढगे यांच्या दवाखाना परीसरात ६ ऑगस्ट रोजी सकाळी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ होमिओ तज्ञ डॉ. ए.यु. शेख हे होते. तर डॉ. प्रभाकर पडघान यांच्यासह डॉ. गणेश वसू, डॉ. अशोक बडगुजर, ॲड. सौरभ ढगे, सौ. नेहा ढगे, सौ. देवयानी महेश ढगे, डॉ. दुर्गासिंग जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हनिमन व स्व. डॉ. अजय ढगे यांच्या प्रतिमेला उपस्थितांनी व होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. पवन बजाज व डॉ. जागृती खरे यांनी स्व. डॉ. ढगे यांची स्मृती जागवणारी गाणी सादर करुन संगीतमय अभिवादन केले. यावेळी बोलतांना डॉ. प्रभाकर पडघान यांनी चार दशकांपूर्वी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात होमिओपॅथी सेवा देणाऱ्या तज्ञांमध्ये स्व. डॉ. अजय ढगे यांचे कार्य खूप प्रेरणादायी होते, असे सांगितले. होमिओपॅथीला शहरात व जिल्ह्यात ओळख मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजच्या पिढीला दिशादर्शक ठरणारे आहेत, असेही डॉ. पडघान यांनी सांगितले. यावेळी डॉ. गोपाल उबरहंडे, डॉ. मनीषा राठी यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दुर्गासिंग जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. स्वाती मसने यांनी केले तर डॉ. पवन बजाज यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. दीपक बढे, डॉ. उमेश जाधव, डॉ. अभिजित पाटील, दंततज्ञ डॉ. आशिष खासबागे, इंजि. धनंजय देशपांडे, डॉ. दीपाली जोशी, डॉ. निलिमा जाधव, डॉ. रसिका वानखेडे, डॉ. दीपाली बारोटे, डॉ. दीपाली जयस्वाल, डॉ. विजया नरवाडे, डॉ. गायत्री सानप, डॉ.

वैष्णवी उबरहंडे, डॉ. स्नेहल नरवाडे यांच्यासह होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनचे सभासद व नागरीक उपस्थित होते. यशस्वीतेसाठी विलास सुरुशे, सागर गायकवाड यांनी परीश्रम घेतले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

मॅरेथॉन

मोजावे वाळवंटाच्या दक्षिणेकडील काठांवर वाढलेला १२ वर्षांचा मुलगा, क्वचित बस चुकल्यावर शाळेत जाण्यासाठी दहा मैलांचा प्रवास करत असतानाच धावण्याच्या प्रेमात पडला. लॉस एन्जेलिस स्थायिक धावपटू ङ्गरिओ लेकशोर.फ एक शांत लक्षपूर्वक धावण्याची दिनचर्या. दररोज किमान १० मिनिटे असे दोन आठवडे धावण्याच्या उद्दिष्टाने धावायला सुरुवात केली आणि आज ती संस्मरणीय कामगिरी ठरली. आजही दररोज धावणे हा त्यांच्या उद्दिष्टाचा एक बेंचमार्क ठरला.

स्पेन तरुणी कॅरोलिना, दुर्दैवाने आई आणि लग्न संपल्यानंतर स्वतः वरचा, स्वतःच्या आयुष्यावरचा राग दूर करण्यासाठी ट्रेडमेलवर स्वतःलाच आव्हान देत होती. प्रशिक्षकांच्या साथीने कठीण काळ जाताच २१ किमी धावून तो विजय आईला समर्पित केला. धावताना अडचणी खूप आल्या. कॅरोलिना म्हणते कधीही धीर सोडू नका, आपले धैय विसरू नका. स्वतःला आव्हान देण्याचा उत्तम मार्ग; धावणे!

मॅरेथॉनमध्ये हजारो माणसे धावतात. प्रत्येकाचे उद्दिष्ट वेगळे. एकाला आपली क्षमता आजमावून पाहायची होती, दुसऱ्याला स्वतःचाच आधीचा विक्रम मोडायचा होता. तिसऱ्याला मॅरेथॉनचा अनुभव घ्यायचा होता, चौथा टी-शर्ट आणि मित्रांसोबत आनंदासाठी. काही आजारांवर, व्यसनावर, ताणावर मात करण्यासाठी, तर काही फिटनेससाठी मॅरेथॉनमध्ये भाग घेतात.

१. स्नायूला दोन वेळा दुखापत होऊनही ऑपरेशन झाल्यानंतर कालांतराने चार पाच मॅरेथॉन पूर्ण करणारे दीक्षित, २. ङ्गतू जिंदगी में कभी दौड नहीं पाएगा, कमसे कम थोडा चालना तो सिखोफ मित्राचे हे शब्द ऐषोरामी जीवन जगणाऱ्या सतीश गुजराल यांना लागले. त्यानंतर सलग पाच वर्षे दक्षिण आफ्रिकेतील अनेक मॅरेथॉन रनरचे मानाचे तुरे त्यांनी मिळविले. पळण्यासारखा दुसरा व्यायाम नाही आणि आनंदही नाही.

मॅरेथॉनमध्ये धावण्याआधी प्रत्येकाला आपण का धावत आहोत? त्यामागचे उद्दिष्ट स्पष्टपणे माहीत असणे आवश्यक आहे. तुमचे उद्दिष्ट तुम्हाला पुढे नेणारे हवे. जेव्हा निराशेने जगणे अपरिहार्य होते, तेव्हा मॅरेथॉनचा विचार करा. मॅरेथॉन शारीरिक आहे तरी त्यासाठी मानसिक दृढता हवी. मॅरेथॉनने शारीरिक आरोग्य चांगले राहते. प्रशिक्षणाशिवाय मॅरेथॉनमध्ये भाग घेऊ नये.

मॅरेथॉन! लांब पल्ल्याची प्रमुख रस्त्यावरून लोकांसमावेत एकत्र धावण्याची शर्यत! जानेवारीतील दुसरा रविवार. या वर्षी १५ जानेवारीला १८व्या टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये ५५००० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी. सर्वांचे अभिनंदन! टाटा मुंबई मॅरेथॉन जनतेच्या आरोग्याचा विचार करते. मॅरेथॉनमध्ये स्पर्धेची विभागणी असल्याने आपल्या कुवतीनुसार सामान्य जनतेसह अनेक नामवंत, भारतीय धावपटू गोपी, श्रीनू, सुधा सिंग सह अनेक हजेरी लावतात.

प्राचीन काळी ग्रीस देशांत मॅरेथॉन गावी पर्शियनसोबत झालेल्या लढाईत ग्रीक जिंकले. मॅरेथॉन विजयाची बातमी सांगण्यासाठी अंगावरच्या शस्त्रासहित एक सैनिक तिथपासून अथेन्सपर्यंत रस्त्यावरून धावत गेला. त्या सैनिकाने रस्त्यावरचे कापलेले तेच अंतर ४२.१९५ किमी होते. तेच अंतर अधिकृतरीत्या स्वीकारले गेले. गावाचे मॅरेथॉन हे नाव स्पर्धेचे झाले. दुर्दैवाने दमल्याने त्या सैनिकाचा अंत झाला. भारतात अनेक ठिकाणी मॅरेथॉन स्पर्धा होतात.

मुंबई मॅरेथॉन चॅम्पियन रायबरेली एक्स्प्रेस सुधा सिंगला अभ्यासापेक्षा लहानपणापासून खेळाची आवड. ट्यूशनला न जाता ट्रॅकवर, एक्स्प्रेस ट्रेनच्या बाजूनेही ती धावत होती. तिच्या वडिलांना समजताच त्यांनी तिला ट्रेनिंगला पाठविले. एक दिवस मार्निंग वॉकच्या वेळी लोकांना धावताना पाहिले. शाळा सोडल्यावर ३० वर्षांनी आपण पळू शकू का? मन स्वस्थ बसेना. ठाणे मरेथॉन, काही वर्षांनी मुंबई टाटांची पूर्ण मॅरेथॉन प्रशिक्षण घेऊन अंजली कुलकर्णीने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

मॅरेथॉनमध्ये दीर्घकाळ धावण्याची क्षमता हवी. म्हणून वेगाने न धावता संपूर्ण शर्यत समान गतीने म्हणजेच वेग नेमका ठेवून शेवटपर्यंत थकवा न येता धावणे (समपेसिंग) योग्य. त्यासाठी दररोज सराव हवा. मॅरेथॉनमध्ये भाग घेण्यासाठी स्टॅमिना, जिद्द, समर्पण हवे. मुख्यतः अंतिम रेषा जोपर्यंत दिसत नाही, तोपर्यंत धावतच राहा. धावताना अनेक अडचणीही येतात. धावणे सोडून द्यावे, पाठी फिरावे, थांबावे असे वाटते; परंतु रेंगाळा, पण न थांबता चालत राहा नि अंतिम रेषा गाठा.

पोलिओची लस वेळेवर न दिल्या गेल्यामुळे पोलिओग्रस्त झालेल्या मुलाच्या कथेवर आधारित चित्रपट ङ्गमॅरेथॉन जिंदगी!फ वडिलांच्या प्रेरणेने अपंगत्वार मात करीत मुलाने यशाचे शिखर गाठले. दिव्यांगाची संघटना सुरू केली असा हा दिव्यांगाच्या संघर्षावरचा चित्रपट. समाजात बरेचजण मानसिक अपंग असल्याने त्यांचे आयुष्य अशांततेत चालू राहते. त्यांनी हा चित्रपट पाहावा.

जीवन एक मॅरेथॉन आहे स्प्रिंट नाही स्प्रिंटमध्ये अल्पावधीवर लक्ष केंद्रित करून वेगाने धावतो. घाईत चुकीचा निर्णय घेतला जाऊ शकतो. मॅरेथॉनमध्ये दूरच्या पल्ल्यावर लक्ष केंद्रित करून धीराने, धीम्या गतीने धावून पाठलाग चालू ठेवायचा लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी मंद गती. ससा कासव शर्यत. समस्यांचे मूळ तणावात असते. शांत राहा. आजूबाजूच्या घडणाऱ्या गोष्टीचा सखोलपणे विचार करून निर्णय घ्या. धावण्याचा आनंद घेत वाटेतले छोटे-छोटे यश साजरे करा. जीवनाप्रमाणे मॅरेथॉनमध्येही लांबचे अंतर पार करताना, काही कालावधी खूप कठीण, तर काही खूप सोपा जातो. येणाऱ्या चढउताराच्या वेळी धावताना मार्गातले अडथळे जाणून, चालण्याचा वेग नियंत्रित करता आला पाहिजे. तुमचा प्रशिक्षणावर विश्वास हवा. ङ्गअंतिम रेषा हेच धेय. जो अंतिम रेषा पार करतो, तो विजयी.फ येथे नंबर नाही. प्रत्येकाचे स्वप्न वेगळे, उद्दिष्ट्य वेगळे, त्यामुळे सारेच यशस्वी. जीवन जगण्याचा महत्त्वाचा धडा मॅरेथॉनचे प्रशिक्षण देते. मॅरेथानमध्ये भाग घेतल्यावर आपल्या जीवनात बदल घडून येतो.

साधारणपणे टाटा मुंबई मॅरेथॉनची आखणी समुद्रालगतच्या मार्गाने असते. समुद्रासोबत रस्त्याच्या कडेला उस्फूर्तपणे स्पर्धकांना चिअरअप करणारे मुंबईकर. तो आनंद मीही घेतला आहे. लहान, तरुण मुलापासून ज्येष्ठ नागरिक, व्हीलचेअरवरील अपंग, हातात बॅनर्स, साऱ्यांचा उत्साह पाहून पुढच्या वर्षी अनेकजण सहभागी होतात. माझ्या आजच्या लेखाचा हाच उद्देश, आनंदासाठी, तंदुरुस्तीसाठी मॅरेथॉनमध्ये भाग घ्या.

प्रामाणिकपणा!

मी तेव्हा सहावी-सातवीत असेन. आईसोबत एका वाण्याच्या दुकानात गेले होते. त्या वयात माझे लक्ष दुकानातील रंगीबेरंगी चॉकलेटकडे, आकर्षक वेस्टनातील वस्तूंकडे, काचेच्या बरणीत ठेवलेल्या खाद्यपदार्थांकडे होते.

आईला साखर विकत घ्यायची होती. त्या दुकानदाराने आईच्या हातात एक दहाची, एक पन्नासची नोट आणि साखरेचा पुडा दिला. त्याबरोबर आई म्हणाली की, मी तुम्हाला पन्नासची नोट दिली, तर तुम्ही मला फक्त दहा रुपये परत द्यायला हवे. असे बोलून आईने पन्नासची नोट त्याच्यासमोर धरली. ते पाहून दुकानदार आईला म्हणाला की, तिने त्याला शंभरची नोट दिली होती. त्यामुळे त्याला साठ रुपये परत करणे भाग आहे. मग दोघेही आपापली बाजू मांडू लागले. आई म्हणाली की, तिच्या पर्समध्ये गेले चार-पाच दिवस ती एकच पन्नासची नोट होती, तर ती शंभरची नोट कशी काय देणार?

दुकानदार म्हणाला की, तुम्ही शंभराची नोट दिल्यावर मी पन्नासचे सुट्टे कसे देणार? बराच वेळ चाललेला हा संवाद मी मन लावून ऐकू लागले. दुकानातील वस्तू पाहण्यात गुंतल्यामुळे आईने कोणती नोट दिली, ते मी पाहिले नाही. मग त्या पन्नासच्या नोटेचं काय झालं मला आठवत नाही. पण त्यादिवशी एक गोष्ट मी आपोआप शिकले ती म्हणजे प्रामाणिकपणा! काही गोष्टी शिकवल्या जात नाहीत, त्या आपण शिकत जातो. त्यातीलच एक महत्त्वाचा गुण म्हणजे प्रामाणिकपणा!

भाजपचा आधार घेतलेल्या पूर्वीच्या विरोधकांना आम्ही पुरुन उरु; उदय सामंतांनी नाव घेता कोणाला दिला इशारा?

छत्रपती संभाजीनगर : भाजपचा आधार घेतलेल्या पूर्वीच्या विरोधकांना आम्ही पुरुन उरु असा इशारा राज्याचे उद्योगमंत्री तथा शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी गुरुवारी (सात ऑगस्ट) पत्रकार परिषदेत बोलताना दिला. जे विरोधक मित्र पक्षात गेले त्यांचा आमच्यावर काहीही परिणाम होणार नाही असेही ते म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मराठवाडा विभागातील पक्षाची स्थिती, तयारी याचा आढावा घेण्यासाठी उदय सामंत छत्रपती संभाजीनगरात आले होते. त्यांनी जालना आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. याच दरम्यान त्यांनी पत्रकारांशी देखील संवाद साधला. यावेळी आमदार अर्जुन खोतकर आणि आमदार विलास भुमरे उपस्थित होते. जालन्यामध्ये अर्जुन खोतकर यांचे कट्टर विरोधक असलेले माजी आमदार कैसाल गोरंट्याल यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला, त्या अनुशंगाने पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उदय सामंत बोलत होते. ते म्हणाले, आमचे नेतृत्व सर्वांना पुरुन उरणारे आहे. जे विरोधक मित्रपक्षात गेले आहेत त्यांना आमचे नेतृत्व पुरुन उरेल.शिवसेनेचे प्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दिल्लीवारी बद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सामंत म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी आपल्या दिल्ली दौऱ्याबद्दल पत्रकार परिषद घेऊन खुलासा केला आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी ते दिल्लीला जात असतील तर त्यात वावगे काय आहे

? देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना भेटण्यासाठी ते गेले असतील तर त्यात गैर काय आहे ? उद्धव ठाकरे यांच्या दिल्ली दौऱ्यावर सामंत यांनी टीका केली.ते म्हणाले, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न मिळावे असे म्हटले होते. आता उद्धव ठाकरे सावरकरांना विरोध करणाऱ्यांसोबत जेवायला दिल्लीला गेले आहेत. महाराष्ट्रात बोलताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबतच्या युतीबद्दल बोलायचे आणि दिल्लीत जाऊन राहुल गांधी यांना पायघड्या घालायच्या हे आता लपून राहिलेले नाही. राहुल गांधी आणि काँग्रेसच्या धोरणानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष चालत आहे असे सामंत म्हणाले.विधानसभा निवडणूकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत महाविकास आघाडीकडून ईव्हीएम ला विरोध केला जात आहे असा उल्लेख करुन सामंत म्हणाले, त्याच ईव्हीएममुळे लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचे खासदार मोठ्या संख्येने निवडून आले. ईव्हीएमवर त्यांचा विश्वास नसेल तर त्यांनी आपल्या खासदारांचे राजीनामे द्यावेत.

लाखांना सौदा; आईसह पाच जणांवर गुन्हा दाखल...

मुंबई : गोवंडीच्या शिवाजीनगर परिसरात सहा दिवसांच्या बालकाचा साडेपाच लाखांना सौदा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. कायदेशीर दत्तक प्रक्रियेविना लहान मुलांची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी माग काढला असून दोन महिलांना याप्रकरणी ताब्यात घेतले आहे. बालकाची सुखरूप सुटका करण्यात आली. त्याच्या आईसह पाच जणांविरुद्ध शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवाजीनगर परिसरात लहान मुलांची बेकायदा खरेदी-विक्री केली जात असल्याची माहिती एका सामाजिक कार्यकर्त्याला मिळाली. त्याने ही माहिती समाजसेवा करणाऱ्या एका दाम्पत्याला दिली. त्यांनी समीर शेख या व्यक्तीला फोन करत लहान मूल हवे असल्याचे सांगितले. त्याने मुलगी हवी असल्यास चार लाख आणि मुलासाठी साडेपाच लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. या दाम्पत्याने मुलगा किंवा मुलगी कोणीही चालेल, असे सांगितल्यावर समीरने सहा दिवसांचे बाळ असल्याची माहिती दिली.याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी शिवाजीनगर पोलिसांना कळवले. बुधवारी, ६ ऑगस्ट रोजी नाझिमा अस्लम आणि फातिमा शेख या दोघी ठरलेल्या ठिकाणी बाळ घेऊन आल्या. त्याचवेळी पोलिसांच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे काही कागदपत्रे आढळली. यानुसार बाळाची जन्मतारीख १ ऑगस्ट आहे. त्यावर सुमय्या खान हिची मुलाची आई म्हणून नोंद आहे. सुमय्या हिनेच समीर शेख याला बाळ विक्रीस दिल्याचे दोघींनी सांगितले. पोलिसांनी या दोघींच्या ताब्यातून बाळाची सुटका करत पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. नाझिमा अस्लम हिच्यावर या आधीही बाळ विक्री केल्याप्रकरणी गोवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे चौकशीतून समोर आले आहे.

जिल्हा रुग्णालयात मोठा घोटाळा; कोव्हिड काळात सरकारची कोट्यवधींची फसवणूक, आरोग्य विभागात खळबळ...

नाशिक : जिल्हा रुग्णालयासह मालेगाव सामान्य रुग्णालयातील ङ्गमॉड्युलर आयसीयूफ्च्या उभारणीचे काम बनावट परवानाधारक कंपनीला देऊन सरकारची कोट्यवधींची आर्थिक फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार नाशिकमध्ये उघड झाला आहे.कोव्हिड काळातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक, मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यासह संबंधित अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या मावळत्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना दिले आहेत.

धक्कादायक म्हणजे जिल्हा रुग्णालयात या माध्यमातून सुमारे ११ कोटींचा घोटाळा झाला असून, संबंधित कंपनीने राज्यात अनेक सरकारी रुग्णालयांचे टेंडर मिळविल्याने या घोटाळ्याची

व्याप्ती ५० कोटींवर पोहोचण्याची शक्यता आहे. या प्रकारामुळे आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे जिल्हा रुग्णालयातील एका कर्मचाऱ्याची पत्नी आणि वडील संबंधित कंपनीचे समभागधारक असल्याचे पुढे आले आहे.करोनाकाळात २०२१-२२मध्ये ईसीआरपी-२ अंतर्गत नाशिक जिल्हा रुग्णालयात ३० खाटांचे, तर मालेगावातील सामान्य रुग्णालयात १० खाटांचे मॉड्युलर आयसीयू तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. याकरिता निविदा प्रक्रिया राबवून ठाणे जिल्ह्यातील क्रेनोव्हेटिव्ह पॉवरटेक प्रा. लि. (सीपीपीएल) या कंपनीकडे ही जबाबदारी सोपवून कामही सुरू करण्यात आले. या निविदा प्रक्रियेबाबत प्राप्त तक्रारींची दखल घेत आरोग्यसेवा तथा अभियान संचालकांच्या आयुक्तांनी अवाजवी खर्चाबाबत आक्षेप घेतला. राज्यस्तरावरून मान्यता न घेताच सुरू केलेले काम थांबविण्याचे निर्देश देऊन खुलासाही मागविला. त्यानंतर तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सकांनी ६ कोटी ७४ लाखांचा सुधारित प्रस्ताव मान्यतेसाठी राज्यस्तरावर पाठविला. विशेष म्हणजे, मूळ किंमत कमी न करता क्युबिकल पार्टिशनचे काम कमी करून हा प्रस्ताव सादर केला गेला.औषध भांडारामार्फत राबविण्यात आलेल्या या निविदा प्रक्रियेची परिमंडळ स्तरावरून दोन वेळा, तर राज्यस्तरावरून एक वेळा विशेष समित्यांमार्फत चौकशी करण्यात आली.

ठाणे येथील अन्न आणि औषध प्रशासनाच्या सहआयुक्तांनी या कंपनीच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, कंपनीने सादर केलेला औषध परवाना खोटा असल्याचे, तसेच वार्षिक टाळेबंद प्रमाणपत्र बनावट असल्याचे स्पष्ट झाले. जिल्हा परिषदेतील लेखा व वित्त विभागातील अधिकाऱ्यांनीही या प्रकरणाची चौकशी पूर्ण करून जुलैअखेरीस त्याबाबतचा अहवाल तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर केला आहे. सरकारची फसवणूक करणाऱ्या संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकण्याचा,

तसेच संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याचा अभिप्राय अहवालात स्पष्टपणे नोंदविण्यात आला आहे. विशेष म्हणजे, जिल्हा रुग्णालयातील एका कर्मचाऱ्याची पत्नी आणि वडील संबंधित कंपनीचे समभागधारक असल्याची धक्कादायक बाब पुढे आली असून, सरकारच्या खरेदी धोरणाच्या शासन निर्णयाचीदेखील यामुळे पायमल्ली झाल्याचे अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे मावळत्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश जिल्हा शल्यचिकित्सकांना दिले आहेत.

चंद्रमुखीमुळे संपली अमृताची प्रतीक्षा; पहिला राज्य पुरस्कार जिंकल्यानंतर म्हणाली- आता थांबण्याची वेळ नाही...

मुंबई: अभिनेत्री अमृता खानविलकरला चंद्रमुखी चित्रपटासाठी महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार मिळाला आहे. या सोहळ्यात मिळालेला उत्कृष्ट अभिनेत्री हा पुरस्कार तिच्यासाठी खूप खास आहे. कारण अमृताला मिळालेला हा पहिलाच राज्य चित्रपट पुरस्कार आहे. ६० व्या आणि ६१ व्या मराठी राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यात तिला हा पुरस्कार देण्यात आला. अमृता सध्या भारतात नसली तरी, तिने सोशल मीडियावर आपला आनंद व्यक्त केला.अमृताला चंद्रमुखी चित्रपटातील भूमिकेसाठी उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. अभिनेत्री सई ताम्हणकरसह तिला (पाँडिचेरी) हा पुरस्कार विभागून देण्यात आला.अमृता सध्या परदेशात आहे. पण तिने तिथूनच या पुरस्काराबद्दलचा आनंद व्यक्त केला. ती म्हणाली, ६० आणि ६१ वा महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा अनेक दिग्गजांच्या उपस्थितीत पार पडला आणि त्यात मला चंद्रमुखीसाठी उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. हा माझ्यासाठी केवळ एक सन्मान नाही, तर खूप मोठी जबाबदारी आहे. हा पुरस्कार मिळाला, हे अजूनही खरं वाटत नाही... पण आज महाराष्ट्र शासनाने, माझ्या राज्याने, मला असा मान दिला याचा मनापासून अभिमान वाटतोय.तिने म्हटले की, या पुरस्कारासाठी संपूर्ण चंद्रमुखी टीमचे- दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कलाकार, स्पॉट बॉय ते मेकअप आर्टिस्ट... सगळ्यांचे मनापासून आभार. तुम्ही घेतलेली मेहनत, दिलेलं प्रेम, हेच आज या पुरस्काराच्या रूपाने फळाला आलंय. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलारजी यांचेही विशेष आभार- कलाकारांवर विश्वास ठेवून, आमच्या कामाचं असे मनापासून कौतुक केल्याबद्दल.अमृताने या पोस्टसह महाराष्ट्र राज्य पुरस्कार सोहळ्यात तिच्या आणि सईच्या नावाची घोषणा झाली, तेव्हाचा एक व्हिडिओ शेअर केला आहे.

तिने पुढे लिहिले की, आज चंद्रमुखीच्या रूपाने प्रेक्षकांनी मला ज्या प्रकारे स्वीकारलं, त्या प्रत्येक प्रतिक्रिया, प्रत्येक भेटलेला प्रेक्षक, त्यांच्या डोळ्यातलं प्रेम.... सगळं आठवतंय. जर मला एक अभिनेत्री म्हणून ओळख मिळालेली असेल, तर ती माझ्या महाराष्ट्रामुळे. हा माझा पहिलाच राज्य पुरस्कार आहे आणि म्हणूनच तो अधिक खास आहे. कायमच लक्षात राहणारा. त्याचबरोबर एक गोष्ट ठामपणे मनात आहे की, हा पुरस्कार म्हणजे थांबण्याची वेळ नाही, तर अजून चांगलं, दर्जेदार आणि मनापासून काम करत राहण्याची नवी प्रेरणा आहे.तिने पोस्टच्या शेवटी असेही म्हटले की, आता यानंतर केवळ चांगल्या लोकांबरोबर काम करत राहायचं, सुंदर कथा सांगायच्या, आणि आपल्या प्रेक्षकांच्या हृदयात पुन्हा एकदा घर करायचं. ती म्हणाली की, महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्याच्या सर्व ज्युरी सदस्यांचे आणि संपूर्ण टीमचेही खूप खूप आभार- हा अविस्मरणीय क्षण माझ्या आयुष्यात आणल्याबद्दल मी कायम ऋणी आहे. मनापासून धन्यवाद. जय महाराष्ट्र. अभिनेत्रीच्या या पोस्टवर कलाविश्वातील अनेक मंडळींनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. चंद्रमुखी सिनेमाचा दिग्दर्शक प्रसाद ओक, तिची सहकलाकार मृण्मयी देशपांडे यांनीही तिचे भरभरुन कौतुक केले. याशिवाय अमृताचा हा पहिलाच राज्य पुरस्कार असल्याने तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे.

राज ठाकरे राहुल गांधींना भेटणार का? पत्रकारांचा प्रश्न, उद्धव ठाकरेंमधला दादू जागा; म्हणाले, आम्ही दोघं भाऊ...

मुंबई :-आम्ही दोन्ही भाऊ सक्षम आहोत. आम्हाला जे करायचे आहे ते आम्ही करू. आमच्यामध्ये तिसऱ्या व्यक्तीची गरज नाहीफ, अशा शब्दांत शिवसेना (उबाठा) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यासोबतच्या युतीबाबत बजावले. ङ्गइंडियाफ आघाडीच्या नेत्यांच्या स्नेहभोजनाला राज ठाकरे दिल्लीत येतील का व ते राहुल गांधी यांची भेट घेतील का, असा प्रश्न विचारला असता, उद्धव यांनी हे उत्तर दिले. व्हीव्हीपॅट बंद करता, मग निवडणुका घेताच कशालाफ, असा उपरोधिक प्रश्नही उद्धव यांनी निवडणूक आयोगाला विचारला. तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आलेले उद्धव यांनी आदित्य ठाकरे व शिवसेनेच्या खासदारांच्या उपस्थितीत पत्रकार

परिषद घेऊन भाजप, मोदी सरकार व निवडणूक आयोगावर सडकून टीका केली. राज ठाकरे यांच्यासोबतच्या युतीबद्दलही उद्धव यांनी भाष्य केले व राहुल गांधी किंवा अन्य कोणाचीही मध्यस्थी आपण स्वीकारणार नसल्याचे सूचित केले.अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के आयातशुल्कावरून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले. ङ्गट्रम्प तुमची (मोदी) खिल्ली उडवत आहेत व तुम्ही त्यांना एका अक्षरानेही उत्तर देत नाही. आपल्या देशाला पंतप्रधान, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि गृहमंत्री हवे आहेत. पण मोदी प्रचारमंत्री आहेत. सरकार कुचकामी आहे आणि परराष्ट्र धोरण कुचकामी आहे. डोळ्यात अश्रू घेऊन मोदी चीनला जातातफ, असे टीकास्त्र ठाकरे यांनी सोडले.मोदी यांच्या सरकारला नीतीमत्ताच राहिलेली नाही. पाकिस्तान आपला शत्रू आहे. तो जोपर्यंत दहशतवाद थांबवत नाही, तोपर्यंत पाकिस्तानसोबत कोणतेही संबंध ठेवायला नको. आपल्या माता-भगिनींचे सिंदूर पुसणाऱ्या पाकिस्तानसोबत आपण क्रिकेट कसे खेळू शकतो. ङ्गसच्चा देशभक्तफ हा पाकिस्तानसोबत कोणतेही संबंध ठेवणारा असूच शकत नाही. त्यामुळे सध्याचे सत्तारूढ ङ्गसच्चे देशभक्तफ यांनी पाकिस्तानसोबत क्रिकेट सामने खेळू नयेतफ, असे आवाहन त्यांनी केले.बिहार विधानसभा निवडणुकीत मतदारयादी पडताळणी होणार असल्याने आता मतदारांना स्वतःच स्वतःची ओळख पटवून द्यावी लागणार आहे. यावरून देशात अघोषित एनआरसी (राष्ट्रीय नागरीक नोंदणी) लागू करण्यात आली आहे का? सीएए आणि एनआरसीचा मुद्दा दिल्लीमध्ये गाजला होता. आसाममध्ये एनआरसीविरोधात आंदोलन झाले होते. कारण त्यात भारतीय नागरिकांना ते भारतीय असल्याची ओळख पटवून द्यायची होती. आताही निवडणूक आयोगाने मतदारयादी पडताळणीच्या निमित्ताने बिहारच्या नागरिकांना तुम्हीच तुमची ओळख पटवून द्या, असे सांगितले आहेफ, असे ते म्हणाले. पत्रकार परिषद झाल्यावर उद्धव ठाकरे दुपारी पाऊणच्या सुमारास सहकुटुंब संसद परिसरात पोहोचले. संविधान सदनामध्ये तिसऱ्या मजल्यावर शिवसेना (उबाठा) पक्षाला संसदीय कार्यालय मिळाले आहे. ठाकरे यांनी पत्नी रश्मी व आदित्य ठाकरे यांच्यासह तेथे पूजन केले. त्यानंतर पक्षाच्या खासदारांसह संवाद साधला. शिवसेना (उबाठा) पक्षाचे हे संसदीय कार्यालय शिवसेनेच्या कार्यालयाशेजारीच आहे.

शिक्षक भरती घोटाळा: राज्यात एसआयटीकडून मोठी चौकशी सुरू; हजारो अधिकारी रजेवर, शिक्षण खात्यात खळबळ

मुंबई :-बनावट शालार्थ आयडी तयार करून बोगस शिक्षक भरती केल्या प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्य सरकारने विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) स्थापना केली आहे. हे पथक नागपूरसोबतच नाशिक, जळगाव, मुंबई आणि मराठवाड्यातील बीड व लातूर येथील शिक्षक भरतीची चौकशी करणार आहे.नागपूर विभागात काही दिवसांपूर्वी बोगस शिक्षक भरतीचा घोटाळा उघडकीस आला. अपात्र शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करून वेतन अदा करण्यात आले. बनावट शालार्थ आयडी तयार करून बोगस शिक्षक भरती प्रकरणी शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांना

अटकही झाली. या प्रकरणात चौकशीसाठी राज्य सरकारने आता एसआयटी नेमली आहे. पुणे येथील विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या नेतृत्वाखाली ही समिती नियुक्त करण्यात आली असून, यात पोलिस महानिरीक्षक मनोज शर्मा, शिक्षण आयुक्तालयातील सहसंचालक हारुण आतार यांचा समावेश आहे. विशेष चौकशी पथकाला अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांचा अवधी देण्यात आला आहे. पथक मराठवाड्यातील बीड, लातूर आदी जिल्ह्यांतील २०१२ पासून ते आजतागायत प्रकरणांची चौकशी, तपास करणार आहे. सरकारच्या या निर्णयाने शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.राज्यातील शिक्षण विभागातील राजपत्रित अधिकारी शुक्रवार, आठ ऑगस्टपासून बेमुदत सामूहिक रजेवर जाणार आहेत. शिक्षणाधिकारी, उपसंचालक, वेतन अधीक्षक असे एक हजार अधिकारी आंदोलनात सहभागी होणार असल्याचे अधिकारी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. शिक्षण विभागाच्या परवानगीशिवाय विनाचौकशी अटकेपासून संरक्षणाची लेखी हमी सरकारने द्यावी, अशा विविध मागण्या संघटनेच्या आहेत. पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखालील तपास पथक २०१२पासून झालेल्या शिक्षक नियुक्त्यांची चौकशी करणार आहे. तीन महिन्यांच्या आत आपला तपास अहवाल समिती सरकारला सादर करणार आहे. समितीला चौकशीसाठी आवश्यक मनुष्यबळ व तांत्रिक साह्य पुरविण्याची जबाबदारी शिक्षण आयुक्त पुण्याच्या यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयांतर्गत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ मान्यता, सेवासातत्य, विना अनुदानित वरून अनुदानित पदावर केलेली बदली यांची तपासणी पथकाकडून केली जाणार असल्याचे सांगण्यात येते. या पार्श्वभूमीवर आता मराठवाड्यातील शिक्षक भरतीही रडारवर आल्याची चर्चा आहे.

श्रेयस अय्यरचं नशिब फळफळणार, फक्त वनडेतच नाही, तर कोणत्या संघात मिळणार संधी...

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय क्रिकेट संघात स्थान नाकारण्यात आलेल्या श्रेयस अय्यरचे कसोटी संघातही पुनरागमन अपेक्षित आहे. त्याची आशिया कप टी-२० क्रिकेट स्पर्धेत खेळणाऱ्या भारतीय संघातील निवड जवळपास निश्चित आहे.श्रेयसची काही महिन्यांपासून केवळ आंतरराष्ट्रीय वन-डे लढतीसाठी भारतीय संघात निवड होत आहे. मात्र, तो कसोटी आणि टी-२० संघाबाहेर आहे. आयपीएलमधील चमकदार कामगिरीनंतर साई सुदर्शनला संधी मिळाली; पण श्रेयसला संघाबाहेरच ठेवण्यात आले. मात्र, आता त्याला संधी देण्याचा निर्णय झाला आहे. आशिया कप टी-२० स्पर्धा नऊ सप्टेंबरपासून, तर वेस्ट इंडिजविरुद्धची कसोटी मालिका दोन ऑक्टोबरपासून आहे. श्रेयससारख्या दर्जेदार फलंदाजाची आणि त्याच्या अनुभवाची भारतीय संघाला गरज आहे. नेमकी याचीच उणीव इंग्लंडमधील मालिकेत जाणवली होती. श्रेयस फिरकीचा चांगल्या प्रकारे सामना करू शकतो. भारतातील वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत हे महत्त्वाचे असेल, याची

निवड समितीस जाणीव आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळातील (बीसीसीआय) वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले. गत वर्षीच्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेनंतर श्रेयसला कसोटी संघात संधी देण्यात आलेली नाही. मात्र, त्याने मुंबईकडून गतमोसमात ६८.५७च्या सरासरीने ४८० धावा करून आपली उपयुक्तता दाखवली होती. त्याने चॅम्पियन्स स्पर्धेतील भारताच्या विजेतेपदात मोलाची कामगिरी करताना ४८.६०च्या सरासरीने २४३ धावा केल्या होत्या. त्याने उपांत्य फेरीत ६२चेंडूंत ४५ आणि अंतिम फेरीत ६२ चेंडूंत ४८ धावा केल्या होत्या.

इंग्लंड दौऱ्यात संधी मिळालेला करुण नायर हा जायबंदी असल्याचे समजते. त्याच्या बोटाला फ्रॅक्चर झाले आहे, असे सूत्रांनी सांगितले. पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या डावात त्याला ही दुखापत झाली. त्याने या कसोटीत ५७ आणि १७ धावा केल्या होत्या. या दुखापतीमुळे तो दुलीप स्पर्धेस मुकणार असल्याची दाट शक्यता आहे. त्याने इंग्लंडमधील मालिकेत २५.६२च्या सरासरीने २०५ धावा केल्या आहेत. इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटीत जायंबदी झालेल्या ऋषभ पंतवर शस्त्रक्रियेची गरज नसल्याचे सूत्रांनी सांगितले. ख्रिस वोक्सला रिव्हर्स स्वीप खेळण्याच्या प्रयत्नात पंतच्या टाचेला दुखापत झाली होती. त्याला सहा आठवडे विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे. यामुळे तो आशिया कप आणि वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका खेळू शकणार नाही.

दारूच्या विळख्यातून उद्ध्वस्त झालेलं कुटुंब, दारूने वडील गमावले, बदला घेण्यासाठी...

नागपूर : दारूने आयुष्य उद्ध्वस्त झालं, वडील गमावले... आणि नंतर या आघाताने एक तरुण गुन्हेगारीच्या मार्गाला लागला. पण ही केवळ चोरी नव्हती, ती एका ङ्गङ्घसामाजिक सूडाचीफ्फ भावना होती. नागपूर शहरात उघडकीस आलेल्या या प्रकारामुळे समाजात व्यसनाधीनतेच्या गंभीर परिणामांची वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. राजा खान उर्फ सलीम खान (वय २१) या तरुणावर शहरातील आठ बार आणि वाईन शॉपमध्ये चोरी केल्याचा आरोप आहे. मात्र चौकशीतून जे उघड झालं, त्याने केवळ पोलिसांनाच नव्हे, तर समाजालाही विचार करायला लावलं. या तरुणाला पाचपावली पोलिसांनी अटक केली आहे.राजाच्या वडिलांचा काही वर्षांपूर्वी अती दारूमुळे मृत्यू झाला. त्यावेळी राजा अल्पवयीन होता. वडिलांच्या मृत्यूनंतर कुटुंबात आर्थिक, मानसिक आणि सामाजिक धक्के बसले. घरचं आधारवड कोसळल्याने त्याच्या मनात बार चालकांविषयी द्वेष निर्माण झाला. ङ्गङ्घहे लोकच समाज बिघडवत आहेत,फ्फ हा विचार त्याच्या मनात खोल रुतून बसला आहे. आणि त्याने बारमध्ये चोरी करून त्यांना ङ्गङ्घधडा शिकवण्याचा मार्ग स्वीकारला. त्याने रात्रीच्या वेळी बारच्या कुलुपं तोडून आत प्रवेश करून रोख रक्कम, सिगारेटचे पाकिटे चोरणं सुरू केलं. विशेष म्हणजे, चोरी केलेल्या पैशांतून स्वतः दारू पित नसे मात्र त्याला गांजाचं व्यसन होतं. त्याचं वागणं केवळ गुन्हेगारी नव्हे, तर मानसिक आघात व अस्वस्थतेचं प्रतिबिंब होतं.३१ जुलै रोजी राणी दुर्गावती चौकातील ङ्गमयुरी सावजी बार अँड रेस्टॉरंटफ येथे झालेल्या चोरीच्या घटनेनंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे या साखळीचा छडा लावला. त्याच्या ताब्यातून ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पोलिस चौकशीत त्याने अंबाझरी, हुडकेश्वर, सदर भागातील वाईन शॉपमध्येही चोरी केल्याची कबुली दिली. या प्रकरणातून एक महत्वाचा सामाजिक मुद्दा समोर येतो. व्यसनाधीनतेचे परिणाम केवळ त्या व्यक्तीपुरते मर्यादित राहत नाहीत. ते संपूर्ण कुटुंब आणि पुढची पिढीही उद्ध्वस्त करू शकतात. राजा खानच्या गुन्ह्याला पाठीशी घालण्याचा कोणताही प्रयत्न नाही, मात्र त्याची मानसिक अवस्था आणि त्यामागची कारणं समाजासाठी आरसा ठरतात. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक खोलात सुरू केला आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना ३६८ कोटी ८६ लाख ८५ हजार मदतीच्या निधीस मान्यता

बुलढाणा जिल्ह्यातील ९० हजार ३८३ शेतकऱ्यांसाठी ७४ कोटी ४५ लाख मदतीच्या निधीस मान्यता

जनसंचलन/बुलढाणा

नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्यास राज्य शासन प्राधान्य देत आहे. राज्यात जून २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभाग आणि सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव, छत्रपती संभाजीनगर व धुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी ३६८ कोटी ८६ लाख ८५ हजार मदतीच्या निधीस मान्यता दिली, असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले. या बाबतचे शासन निर्गमित जारी करण्यात आले आहेत. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील ९० हजार ३८३ शेतकऱ्यांच्या ८७३९०.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७४ कोटी ४५ लाख ३ हजार रुपये निधीचा समावेश आहे. अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेतपिकांच्या मान्यता देण्यात आलेल्या निधीमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागासाठी १४ कोटी ५४ लाख ६४ हजार, अमरावती विभागासाठी ८६ कोटी २३ लाख ३८ हजार आणि सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव, छत्रपती संभाजीनगर व धुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी २६८ कोटी ८ लाख ८३ हजार निधीचा समावेश आहे. आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांप्रती शासन संवेदनशील असून या बाधित शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी बाधित पिकांचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. प्रशासनानेही बाधित अतिवृष्टी, पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे तातडीने पंचनामे केल्याने बाधित शेतकऱ्यांना करण्यात येणाऱ्या निधीस मान्यता देण्यात आली. जून २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १७१ शेतकऱ्यांच्या ७२.३२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १६.०१ लाख, हिंगोली जिल्ह्यातील ३ हजार २४७ शेतकऱ्यांच्या १६११.३७ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३६०.४५ लाख, नांदेड जिल्ह्यातील ७ हजार ४९८ शेतकऱ्यांच्या ४७९०.७८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १०७६.१९ लाख आणि बीड जिल्ह्यातील १०३ शेतकऱ्यांच्या ११ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १.९९ लाख निधीचा समावेश आहे. अमरावती विभागातील अमरावती जिल्ह्यातील २ हजार २४० शेतकऱ्यांच्या १३१२.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २७५.७९ लाख, अकोला जिल्ह्यातील ६ हजार १३६ शेतकऱ्यांच्या ३७९०.३१ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४०५.९० लाख, यवतमाळ जिल्ह्यातील १८६ शेतकऱ्यांच्या १३०.५० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २५.४५ लाख, बुलढाणा जिल्ह्यातील ९० हजार ३८३ शेतकऱ्यांच्या ८७३९०.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७४४५.०३ लाख आणि वाशिम जिल्ह्यातील ८ हजार ५२७ शेतकऱ्यांच्या ५१६२.२८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४७१.२१ लाख निधीचा समावेश आहे. सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव जिल्ह्यातील ३ लाख २७ हजार ९३९ शेतकऱ्यांच्या १८९६१०.७० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २६१४३.३८ लाख, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७ हजार ५४८ शेतकऱ्यांच्या ४८९१.०५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ६६५.४१ लाख तर धुळे जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांच्या ०.३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ०.०४ लाख निधीचा समावेश आहे. या निर्णयामुळे बाधित शेतकऱ्यास दिलासा मिळणार असून शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदतीस मान्यता दिल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

माऊली पेट्रोलींक्स येथे कालभैरव कावड यात्रेचे स्वागत

जनसंचलन/बुलडाणा

श्रावण महिना लागला आहे आणि संपूर्ण ठिकाणी कावड यात्रेचा शुभारंभ झाला आहे.माऊली पेट्रोलींक्स येथे कालभैरव कावड यात्रेचे स्वागत करण्यात आले आहे. पवित्र अशा श्रावण महिन्यात दरवर्षी स्थानिक सोमनाथ मंदिर डोंगरशेवली येथून निघून सुंदरखेड (बुलढाणा) पर्यंत काळभैरव ग्रुप तर्फे कावड यात्रा काढण्यात येते.दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सदर कावड यात्रेचे भव्य स्वागत खामगाव रोड स्थित माऊली पेट्रोल पंप येथे करण्यात आले. माऊली पेट्रोल पंपाचे संचालक प्रतीकभाऊ गायकवाड व विजय तोमर , विजय शेगोकार , पंकज पोपळघट यांच्या वतीने संपूर्ण कावडधारी मंडळीना फराळ वाटप आणि चहा वाटप करण्यात आले. अतिशय भक्तिमय अशा वातावरणात परिसरातील रहिवासी नागरिक आणि कर्मचारी वृंद यांनी यावेळी सेवा दिली



ब्रह्माकुमारी आश्रम बुलढाणा येथे मूल्यनिष्ठ पत्रकारिता या विषयावर चर्चासत्र...

जनसंचलन/बुलढाणा

ब्रह्माकुमारी आश्रम बुलढाणा येथे मूल्यनिष्ठ पत्रकारिता या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते आजच्या सायबर युगामध्ये पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये टिकून राहणे खूप मोठ्या आव्हान आहे सत्य समाजासमोर मांडणे आणि समाजाचे परिवर्तन करणे ही मोठी जबाबदारी फिरताना मूल्यनिष्ठ पत्रकारितेची आवश्यकता आहे या विषयाला अनुसरून ब्रह्माकुमारी आश्रम ,एकता नगर ,बुलढाणा येथे मीडिया स्नेह मिलनचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू स्मृती ही करण्यात आली त्यानंतर ब्रह्माकुमारी आश्रम च्या संचालिका ब्रह्माकुमारी उर्मिलादीदी यांनी स्वागत संबोधन केले. त्यानंतर राजयोग मेडिटेशन द्वारे सर्वांना शांतीची अनुभूती करवण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता म्हणून माउंट आबू इथून आलेले मीडिया विंगचे राष्ट्रीय संयोजक ब्रह्माकुमार डॉक्टर शांतनुभाई यांनी म्हटले की लोकतंत्राचे तीन स्तंभ न्यायपालिका ,कार्यपालिका, विधानपालिका मध्ये मूल्यांचे पतन झाले आहे. सोबतच पत्रकारिता मध्ये भौतिक मूल्य आणि सामाजिक मूल्यांमध्ये कमी आलेली आहे वर्तमान समय भौतिक मूल्यांचा बोलबाला झाला आहे. आजादीच्या पूर्वी पत्रकारिता जी होती त्यांनी आपला भारत देश स्वातंत्र्य केला होता. त्याचा आधार होता सत्यता, पारदर्शिता निष्पक्षता आणि विश्वासनीयता. वर्तमान डिजिटल युगामध्ये सोशल मीडिया आपल्या जीवनाचा एक अभिन्न अंग बनला आहे .सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ने आपल्या जीवनामध्ये क्रांती आणली परंतु आपल्याला मानसिक भावनात्मक आणि आध्यात्मिक विकासावर नकारात्मक प्रभाव त्याचा पडत आहे . त्यानंतर त्यांनी म्हटले की वर्तमान समय फेक बातमी समाजांवर नकारात्मक प्रभाव पाडत आहे आता मीडियाची विश्वासनीयता प्राणपणावर आहे त्यामुळे मीडियामध्ये आध्यात्मिक मूल्यांची आवश्यकता आहे टीआरपी आणि विज्ञापन त्याच्या शर्यतीमध्ये पत्रकार नैतिकता तसेच शाश्वत मूल्य विसरत जात आहे . हिंसा, अश्लीलता , नग्नता आदी आधी पेपर मध्ये छापण्यासाठी कॉम्पिटिशन लागली आहे जे मीडिया मिशन च्या रूपामध्ये कार्य करत होते ते आता प्रोफेशन तथा सेन्सेशन कमिशन या चक्रामध्ये गुंतला गेला आहे. आपल्या पत्रकारितेमध्ये सकारात्मक मूल्यांची पुनः स्थापना होण्याची आवश्यकता आहे. उद्घाटन समारंभ किती प्रचलन करून करण्यात आला. उद्घाटकीय संबोधनात श्री रणजीत सिंह राजपूत सर अध्यक्ष अ.भा. मराठी

पत्रकार संघ बुलढाणा जिल्हा यांनी नैतिक मूल्य या विषयावर बोलताना म्हटले की आज प्रत्येक व्यक्तीला मूल्य जोपासण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी आपल्याला आध्यात्मिकते ची जोड देणे आवश्यकता आहे .मी कोण ,माझी कर्तव्य काय हे मला स्वतः शोधाव लागेल तुमचे वर्तन ,तुमचे आचरण हे समान पाहिजे त्याशिवाय नैतिक मूल्य ही आपल्या जीवनामध्ये येणार नाही.

बुलढाण्यात सायबर क्राईमचे जाळे!

तब्बल २ कोटी ३० लाख ७४ हजारांची फसवणूक!

जनसंचलन/बुलढाणा

सर्वत्रच सायबर अपराधांचे प्रमाण वेगाने वाढत चालले आहे. दररोज कुठेना कुठेतरी सायबर फ्रॉडच्या घटना घडतच असतात. जिल्ह्यात या वर्षात आता पर्यंत महिला व फसवणूकीबाबतचे ३५ गुन्हे दाखल झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सरकारी आकडेवारीनुसार २०२५ या वर्षात सायबर फसवणुकीचे बळी ठरलेल्या १२ गुन्ह्यात सायबर भामट्यांनी तब्बल २ कोटी ३ लाख ७४ हजार ६८६ रुपये उकळले आहेत. त्यापैकी ८ गुन्ह्यातील १ कोटी ६ लाख ४९ हजार रुपये सायबर पोलिसांनी हस्तगत करून परत केले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेलचे ठाणेदार प्रकाश सदगीर, एएसआय शकील खान, राम मुंडे, कुणाल चव्हाण, भरत जंगले, राजदीप वानखेडे, विकी खरात, क्षितिज तायडे यांनी ही कारवाई केली आहे.सध्या सायबर गुन्हेगारीचे

प्रमाण प्रचंड वाढत आहे. त्यामुळे अनेकांची ऑनलाईन फसवणूक होते. हे सायबर गुन्हेगार किंवा हॅकर्स अनेकांच्या बँक डिटेल्स मिळवून आर्थिक फसवणूक करतात.सायबर गुन्हेगार लोकांशी सायकॉलॉजिकल माईंड गेम खेळतात आणि सायबर चोरी करण्यासाठी कोणत्याही पातळीपर्यंत जाऊ शकतात. त्यामुळे या गुन्हेगारांच्या कोणत्याही भूलथापांना बळी पडू नका आणि आपली पर्सनल माहिती चुकूनही शेअर करू नका. पर्सनल माहिती कुटुंबातील सदस्यांव्यतीरिक्त इतर कुणालाही शेअर करू नका अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. हॅकिंग : एखाद्याचे शोशल मिडीया अकाउंट हॅक करून त्याचा गैरवापर करणे फिशिंग : खोट्या लिंक्स किंवा मॅसेजद्वारे वैयक्तीक माहिती किंवा बँक डिटेल्स मिळवण्याचा प्रयत्न करणे फेक अकाउंट: बनावट प्रोफाईल तयार करून फसवणूक करणे सोशल मीडियावर बनावट खाते तयार करून आर्थिक फसवणूक केली जाते.अधिकारी असल्याचा बनाव करून आर्थिक लुबाडणूक केली जाते.त्यामुळे सोशल मीडियावर सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे, यातून फसवणूक टाळता येऊ शकते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या बांधकामात भ्रष्टाचार?

जनसंचलन/ चिखली

छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू असलेल्या अश्वारूढ पुतळ्याच्या पायाभरणीच्या (बेस) कामात सुरुवातीलाच मोठा भ्रष्टाचार उघड झाल्याचा आरोप आहे. काम इस्टिमेटप्रमाणे न करता त्यात दर्जाची तडजोड झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर सोमवार ४ ऑगस्ट रोजी चिखली शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपस्थित राहून संबंधित अभियंत्याला जाब विचारण्यात आला. काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी ठाम भूमिका घेत, हे काम योग्य प्रकारे आणि कोणतीही तडजोड न करता पार पडले पाहिजे, अशी मागणी केली. बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी तपासणी केल्यानंतर पाया चुकीच्या पद्धतीने बांधल्याचे आणि त्यात इस्टिमेटनुसार आवश्यक असलेले गज (लोखंडी सळया) न वापरता दुसऱ्याच दर्जाचे साहित्य वापरल्याचे निष्पन्न झाले आहे. या कामात ठेकेदाराकडून तडजोड करण्यात आली असल्याने हा पाया हटविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी ठाम भूमिका घेत, हे काम योग्य प्रकारे आणि कोणतीही तडजोड न करता पार पडले पाहिजे, अशी मागणी केली. यावेळी शेअर काँग्रेस अध्यक्ष राहुल सवडतकर,अतहर काझी ,राजू गवई ,कुणाल बोंद्रे ,निलेश गावंडे,डॉ इसरार ,शहजात अली खान ,राजू रज्जाक ,जका भाई,खलिल बागवान ,भिकाजी शेटे ,सचिन शेटे,जय बोंद्रे ,अमोल लहाने ,विलास ननंई,शोएब मुसा,गोकुळ शिंगणे,आरीफ बागवान, शकील भाई यांच्यासह शेकडो काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

लाडकी बहिण योजने चा सर्वे अंगणवाडीच्या ताई करणार नाहीत!

मातृत्व वंदनेचे काम देखील इंग्रजी लिंक असल्याने होणार नाही! सुपरवायझर करतो रात्री-बेरात्री कामासाठी फोन

जनसंचलन/बुलढाणा

अंगणवाडी सेविकांना वेगवेगळे कामे करावी लागतात.परंतु महिला बाल विकास विभागाने परिपत्रक काढून अंगणवाडी सेविकांची इतर कामांपासून आदेशाने सुटका केली असली तरी, जिल्ह्यात त्यांच्यावर अतिरिक्त काम लादले जात आहे. लाडकी बहिण योजनेचा सर्वे करा..मातृत्व वंदनेचे काम करा..अशी अनेक कामे सुपरवायझर रात्री-बेरात्री फोन करून सांगत असल्याने, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका कर्मचारी युनियन (आयटक) यांनी जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन न्याय हक्क मिळवून देण्याची मागणी केली आहे. आता अंगणवाडी सेविकांना इतर कामे सांगायची असल्यास थेट शासनाची परवानगी आवश्यक आहे.अंगणवाडी सेविका कर्मचाऱ्यांवर जिल्हास्तरावरून विविध प्रकारची कामे लादली जातात.त्यामुळे मुलांना शिकवण्यावर परिणाम होत असतो. मात्र, आता अंगणवाडी सेविकांना अशी अतिरिक्त कामे लादता येणार नाहीत. कामे सांगायची असल्यास त्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागणार आहे. महिला बाल विकास विभागाने या संदर्भात परिपत्रक काढले आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना एकात्मिक बाल विकास सेवा व्यतिरिक्त इतर कामे लादू नयेत. लादायची असतील तर शासनाच्या मान्यता गरजेची आहे, असे परिपत्रकात म्हटले आहे. मात्र बुलढाणा जिल्ह्यात मनमानी कारभार सुरू असल्याची तक्रार जिप सिइओंकडे निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, अंगणवाडीच्या कामा व्यतिरीक्त इतर विभागाचे कामे सुध्दा दिल्या जातात. त्याबाबत लेखी कोणताही आदेश मिळत नाही. तसेच अंगणवाडीसाठी शासनाचा जि.आर. आहे की, अंगणवाडी कामाव्यतिरीक्त इतर कोणत्याही विभागाचे काम देण्यात येऊ नये. तरी सुध्दा सुपरवाझर यांचे माध्यमातुन जबरदस्तीने काम करुन घेण्याचा प्रयत्न होत आहे.एफ.आर. एस.च्या कामाबाबत सक्त करण्यात येऊ नये. कारण ब-याच ठिकाणी रेंजचा अडथळा असतो. तसेच ४-४ तास एका व्यक्तिचे एफ. आर. एस. होत नाही. अंगणवाडीचे कामात इतर कामे करुनच एफ.आर. एस.करण्यात येइल त्यामुळे एफ. आर.एस.ची सक्ती करण्यात येऊ नये तसेच लाडकी बहिण योजनेचा जो सर्वे आहे तो अंगणवाडी सेवीका करणार नाहीत. कारण अंगणवाडीचे वेळेत काम करणे शक्य नाही. त्यामुळे हे काम अंगणवाडी सेवीका करणार नाहीत आणि मातृत्व वंदनेचे काम करण्यासाठी जबरदस्ती करण्यात येत आहे. त्याची लिंक ही पुर्ण इंग्रजीत आहे व हे अंगणवाडी सेवीकांना शक्य नाही. त्यामुळे हे आम्ही करणार नाही, असे निवेदनात म्हटले आहे. सुपरवायझरच्या माध्यमातुन अंगणवाडी सेवीकेवर कोणत्याही कामाचा दबाव आणल्या जातो. अंगणवाडीचे व्यतिरीक्त कामाबाबत सुपरवायझर हे रात्री बेरात्री फोन करत असतात व म्हणतात की, हे काम तुम्हाला करावेच लागेल. तसेच काही सुपरवायझर यांनी काही अंगणवाडी सेवीकांच्या पगारात सुध्दा कपात केलेली आहे. त्यामुळे मागील महिन्यात ब-याच अंगणवाडी सेवीकांचे पगार कमी प्रमाणात आलेले आहे. बुलडाणा जिल्हयातील सर्व अंगणवाडी सेवीका ह्या दबावाखाली काम करीत असुन त्यांना मानसीक त्रास होत असल्याने जिल्ह्यातील २ अंगणवाडी सेवीका यांना हृदयविकाराचा अटॅक आल्याने सिंदखेड राजा तालुक्यातील दुसरबीड येथील व बुलडाणा तालुक्यतील साखळी येथील अंगणवाडी सेवीका ह्या मयत झालेल्या आहेत. करीता अंगणवाडी कामाबाबत योग्य मार्ग काढला नाही तर जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी सेवीका, मदतनिस जि.प.बुलडाणा येथे उपोषणास बसतील असा इशारा नियोजन देण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८